# १२ - प्रा.आ.केंद्र देखभाल दुरुस्ती निधी

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियांना अंतर्गत प्रत्येक प्रा.आ.केंद्रास प्रति वर्ष रु. ७५,०००/- निधी उपलब्ध होणार आहे. यामधुन प्रा.आ. केद्राची किरकोळ दुरुस्ती तसेच रुग्णांना सेवा देतांना केंद्राच्या प्राथमिक गरजा वेळीच भागविणे शक्य व्हावे यासाठी प्रा.आ. केंद्रस्तरावर रुग्ण कल्याण समितीच्या संमतीने खालील बाबींवर खर्च करता येईल.

१) शस्त्रक्रियेगारे, लेबर रुम, वार्ड मधील गळती
२) इलेक्ट्रीफिकेशन, वायरिंगची कामे,
३) नळ दुरुस्ती, पाईपलाईन, ड्रेनेज सिस्टीम संबंधी दुरुस्ती किंवा कामे
४) संडास बाथरुम दुरुस्त्या.
५) रंगकाम, खिडक्या, दरवाज्यांच्या कड्या कोंडे, पाणीपुरवठा विषय़क कामे.
६) दरवाजे/खिडक्यांना पडदे, पंखे, लाईट ट्युब बदलविणे.
७) रुग्ण तपासणी टेबल, डिलेव्हरी टेबल, बी.पी. ऑपरेटस, हिमोग्लोबिन मीटर, तांबी बसविण्याची किट, इंन्स्ट्रुमेंट ट्रे, बेबी ट्रे, वेईग मशीन प्लास्टीक/रबर शीट, स्ट्रेटोस्कोप, बादल्या.
८) संस्थेची स्वच्छता करणे, (यामध्ये दैनंदिन स्वच्छतेचा समावेश नाही)
९) तातडीच्या रुग्णांना संदर्भ सेवेकरिता वाहन व्यवस्था.
१०) साथीच्या काळामध्ये प्रयोगशाळा तपासणीसाठी विहित नमुने पाठविण्यासाठीचा खर्च.
११) संस्थेकरिता लागणारे बँडेज विकत घेणे.
१२) ब्लिचींग पावडर आणि इतर निर्जंतुक करणाची रसायने विकत घेणे.
१३) परिसर स्वच्छतेअंतर्गत केलेल्या कामांची मजुरी तसेच डासांच्या आळ्यांच्या नाशांसाठी केलेल्या कारवाहीकरिता खर्च.
१४) आशा या गावपातळीवरिल स्वयंसेविकेने केलेल्या काही निवडक कामाचा मोबदला.
१५) शोषखड्ड्यांची दुरुस्ती.